नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/02/2024 (शुक्रवार) सकाळ

## अपघातात मृत्यू झालेले पोलीस हवालदार जयंत शेरेकर यांच्या कुटुंबियांना ०१ कोटी रूपयाची मदत नागपूर ग्रामीण पोलीस दल व एचडीएफसी बँकेचा पुढाकार

नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातील पोलीस स्टेशन पारशिवनी येथे कार्यरत असलेले पोलीस हवालदार जयंत शेरेकर, बक्कल नंबर १२२४ यांचे दिनांक २३/११/२०२२ रोजी कर्तव्यावर हजर असताना अपघाती निधन झाले होते. या अपघातामध्ये मृतक जयंत शेरकर यांच्या परिवाराला सहाय्य करण्याच्या दृष्टीकोणातून नागपूर ग्रामीण पोलीस दल व एचडीएफसी बँकेने सकारात्मक पाऊले उचलली. त्यानुसार दिनांक ०२/०२/२०२४ रोजी एचडीएफसी बँकेकडुन प्राप्त ०१ कोटी रुपये रकमेचा वेतन विमा सहायता निधीचा धनादेश पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार यांच्या हस्ते मृतक जयंत शेरकर यांची पत्नी प्रविणा जयंत शेरकर यांना देण्यात आला आहे. यावेळी पोलीस उप अधीक्षक (गृह) श्री. विजय माहुलकर, उप उपाध्यक्ष EBFS, HDFC बँक विदर्भ सर्कल श्री. महेश धकाते व ब्रांच मेनेजर एचडीएफसी बँक सदर ब्रांच श्री. अमित व्यवहारे, श्री. रितेश पॉल यांची उपस्थिती होती. अपघातामुळे मृत्युमुखी पडणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना वेळीच सहाय्यता मिळावी याकरीता नागपूर ग्रामीणचे पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार हे सदैव प्रयत्नरत असल्याबाबत यावेळी त्यांनी आश्वासन दिले आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर